**तात्काळ**

क्रमांक : ७५५ / ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ९ जानेवारी, २०२०

**प्रेषक :**

सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

विधानसभेचे सर्व सन्मा.सदस्य

**विषय :- मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्विकारण्याबाबत...**

**महोदय / महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्रं विधानसभेच्या **सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२०** रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या आगामी अधिवेशनाकरीता तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरीता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग-दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना **गुरुवार, दिनांक ९ जानेवारी, २०२०** रोजी वितरीत करण्यात येत आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

**शुक्रवार, दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजीपासून QIS या संगणक प्रणालीवर ONLINE पद्धतीने तारांकित प्रश्न सूचना स्विकारण्यात येतील. मा.सदस्यांना प्रश्न सूचना स्विकारण्याच्या प्रथम दिनांकापासून केव्हाही तथापि, चक्रानुक्रमात नमूद केलेल्या विवक्षित उत्तराच्या दिनांकाकरिता प्रश्न सूचना स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्रश्न सूचना या सचिवालयाकडे ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.**

कृपया याची नोंद घ्यावी.

आपला,
(स्वाक्षरी)
**( शिवदर्शन साठ्ये )**
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :-**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये,
विधान भवन, मुंबई ४०० ०३२.

ROTA-HB-953 (600-1-2020).

# महाराष्ट्र विधानसभा
## पत्रक भाग दोन

**गुरुवार, दिनांक ९ जानेवारी, २०२० / पौष १९ शके, १९४१**

**महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२० मधील द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम**

१. महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२० मधील द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाकरिता माननीय मंत्रीमहोदयांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय अध्यक्षांनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नांचे उत्तर हवे असेल तो दिनांक विवरणाच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक विवरणाच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नांच्या सूचना मिळण्याच्या अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्या पूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेतील आखलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल. मा.सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधिन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे (पृ.क्र.३ व ४)

पहिल्या आठवड्यातील तारांकित स्विकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट सोमवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२० रोजी दुपारी ४.०० वाजता व त्यापुढील आठवड्यांतील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट त्यानंतरच्या प्रत्येक सोमवारी दुपारी ४.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे उप सचिव / अवर सचिव / अवर सचिव (समिती) यांच्या दालनात घेण्यात येईल. याबाबतची माहिती पत्रक भाग दोनद्वारे स्वतंत्ररित्या मा.सदस्यांना कळविण्यात येईल. सदरहू बॅलटसाठी मा.सदस्यांना उपस्थित राहता येईल, **परंतु त्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

## वि व र ण प त्र

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) गृह मंत्री<br>(२) महसूल मंत्री<br>(३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>(४) कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री<br>(५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री<br>(६) वस्त्रोद्योग, मत्सव्यवसाय, बंदरे मंत्री | **सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२०**<br>**सोमवार, दिनांक २ मार्च, २०२०**<br>सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२०<br>सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२०<br>*सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२० | **शुक्रवार, दिनांक २४ जानेवारी, २०२०**<br>**शुक्रवार, दिनांक ३१ जानेवारी, २०२०**<br>शुक्रवार, दिनांक ७ फेब्रुवारी, २०२०<br>शुक्रवार, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२०<br>*गुरुवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२० |
| दोन | (१) मुख्यमंत्री<br>(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(३) गृहनिर्माण मंत्री<br>(४) नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२०<br>मंगळवार, दिनांक ३ मार्च, २०२०<br>मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२०<br>*मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२० | शुक्रवार, दिनांक २४ जानेवारी, २०२०<br>शनिवार, दिनांक १ फेब्रुवारी, २०२०<br>शनिवार, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२०<br>*गुरुवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२० |